भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण (प्रतिषेध) अधिनियम, १९८६

**(१९८६ चा अधिनियम क्रमांक ६०)**

[२ मे १९९७ रोजी यथाविद्यमान]

# The Indecent Representation of Women (Prohibition) Act, 1986

**(Act No. 60 of 1986)**

[*As in force on the 2nd May 1997*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९९९)

**[ किंमत : रु. ३-०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २ मे १९९७ रोजी यथाविद्यमान असलेला दि इन्डिसेंट रिप्रेझेंटेशन ऑफ वुमेन (प्रोहिबिशन) ॲक्ट, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ८, अंक १, दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ यात पृष्ठ ५६ ते ५८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

**नवी दिल्ली :**
दिनांक २२ ऑक्टोबर १९९७.

**डॉ. रघवीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Indecent Representation of Women (Prohibition) Act, 1986, as on the 2nd May 1997 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 8, dated 22nd October 1997 on pages 56 to 58.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2 Clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act, in Marathi.

New Delhi:
Dated 22nd October 1997.

DR. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

एच ४४३७ (१०३९—९-९९)

# स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण प्रतिषेध अधिनियम, १९८६

## कलमांचा क्रम

कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण असणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंध करणे.

४. स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण असणारी पुस्तके, पत्रके पोस्टाने पाठविण्यात किंवा त्याचे प्रकाशन करण्यास प्रतिबंध करणे.

५. प्रवेश करण्याची व झडती घेण्याची शक्ती.

६. शास्ती.

७. कंपनीकडून घडणारे अपराध.

८. जामीनयोग्य व दखली अपराध.

९. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

१०. नियम करण्याची शक्ती.

# स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिषेध) अधिनियम, १९८६

**(१९८६ चा अधिनियम क्रमांक ६०)**

(२ मे, १९९७ रोजी यथाविद्यमान)

[२२ डिसेंबर, १९८६]

**जाहिरातींद्वारे किंवा प्रकाशने, लेख, चित्रे, आकृत्या यांमधून किंवा अन्य कोणत्याही रीतीने स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण करण्यास प्रतिषेध करणारा व त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिषेध) अधिनियम, १९८६ असे म्हणता येईल.

(२) जम्मू व काश्मीर या राज्यांव्यतिरिक्त संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित असेल तर, या अधिनियमात,—

(क) "जाहिरात" यामध्ये कोणतीही सूचना, परिपत्रक, खूणचिठ्ठी (लेबल), वेष्टन किंवा अन्य दस्तऐवज यांचा समावेश आहे. तसेच, कोणताही प्रकाश, ध्वनी, धूर किंवा वायू या साधनांनी तयार केलेले कोणतेही दृश्य प्रतिरुपण याचा देखील यात समावेश आहे.

(ख) "वितरण" यामध्ये नमुना म्हणून केलेल्या वितरणाचा, मग ते मोफत किंवा कसेही, केलेले असो, समावेश आहे.

(ग) " स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण " याचा अर्थ, एखाद्या स्त्रीच्या आकृतीचे, तिच्या आकाराचे, तिच्या शरीराचे किंवा कोणत्याही भागाचे असभ्य वाटेल अशा प्रकारे तिला कमीपणा आणणारे किंवा अपमानास्पद असेल अशाप्रकारे किंवा सार्वजनिक नीतिमत्ता किंवा नैतिकता डळमळीत करण्याचा, भ्रष्ट करण्याचा किंवा तिला क्षति पोचवण्याचा संभव असणारे, चित्रण करणे, असा आहे.

(घ) "खूणचिठ्ठी (लेबल)" याचा अर्थ, कोणत्याही पुडक्यावर चिकटवलेला किंवा त्यावर दिसून येणारा कोणताही लेखी, चिन्हांकित, मुद्रांकित, मुद्रित किंवा आलेखीय मजकूर, असा आहे.

(ङ) "पुडके" यामध्ये पेटी, खोका, पत्र्याचा डबा किंवा अन्य पात्र यांचा समावेश होतो.

(च) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात येतील त्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

**स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण असणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंध करणे.**

३. कोणतीही व्यक्ती, कोणत्याही स्वरूपात स्त्रीचे असभ्य प्रतिरुपण जीमध्ये अंतर्भूत आहे अशी कोणतीही जाहिरात प्रकाशित करणार नाही किंवा प्रकाशित करविणार नाही किंवा ती प्रकाशित करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा तिच्या कोणत्याही प्रकाशनामध्ये किंवा प्रदर्शनामध्ये भाग घेणार नाही.

**स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण असणारी पुस्तके, पत्रके पोस्टाने पाठविण्यास किंवा त्याचे प्रकाशित करण्यास प्रतिबंध करणे.**

४. कोणतीही व्यक्ती, ज्यामध्ये कोणत्याही स्वरूपात स्त्रीचे असभ्य प्रतिरुपण असेल असे कोणतेही पुस्तक, पत्रक, पत्रिका, सरकचित्र, चित्रफीत, लेख, चित्र, रंगचित्र, छायाचित्र, प्रतिरुपण किंवा आकृती यांची निर्मिती करणार नाही किंवा करवून घेणार नाही, किंवा त्यांची विक्री करणे, ते भाड्याने देणे, त्याचे वितरण करणे, ते प्रस्तुत करणे किंवा ते टपालाने पाठवणे या गोष्टी करणार नाही :

परंतु,—

(क) (एक) ज्याचे प्रकाशन, ते विज्ञान, साहित्य, कला किंवा शिक्षण किंवा सर्वसाधारण जनतेला आस्था वाटणारे अन्य विषय यांसाठी असल्याच्या कारणावरून लोकहितार्थ असल्याने करणे उचित असल्याचे सिद्ध झाले असेल ;

(दोन) जे खऱ्याखुऱ्या धार्मिक प्रयोजनांसाठी ठेवलेले असेल किंवा उपयोगात आणले जात असेल

असे कोणतेही पुस्तक, पत्रक, वृत्तपत्रिका, सरकचित्र, चित्रफीत (फिल्म), लेख, चित्र, रंगचित्र, छायाचित्र, प्रतिरूपण किंवा आकृती ;

(ख) (एक) प्राचीन स्मारकशिल्प आणि पुरातत्वीय स्थळ व अवशेष अधिनियम, १९५८ (१९५८ चा २४) याच्या अर्थांतर्गत कोणत्याही प्राचीन स्मारकशिल्पात, किंवा, त्यावर, अथवा

(दोन) कोणत्याही देवालयावर किंवा देवालयात किंवा मूर्तीच्या वहनासाठी किंवा कोणत्याही धार्मिक प्रयोजनासाठी ठेवलेली किंवा वापरण्यात येणारी मोटारवाहने यांवर खोदलेले, कोरलेले, रंगविलेले किंवा अन्य प्रकारे प्रतिरूपित केलेले कोणतेही प्रतिरूपण ;

(ग) "चलचित्रक अधिनियम, १९५२" (१९५२ चा ३७) याच्या भाग दोनचे उपबंध जिच्या संबंधात लागू होतील अशी कोणतीही फिल्म, यांना या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

प्रवेश करण्याची व झडती घेण्याची शक्ती.

५. (१) विहित करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने राज्य शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही राजपत्रित अधिकारी हा ज्या क्षेत्रासाठी त्याला प्राधिकृत केले असेल त्या क्षेत्राच्या स्थानिक मर्यादेत,—

(क) त्याला आवश्यक वाटत असेल असे कोणतेही सहाय्य घेऊन, ज्या जागेत या अधिनियमाखालील अपराध घडला असेल किंवा घडत आहे असे त्यास सकारण वाटत असेल, अशा कोणत्याही जागेत सर्व वाजवी वेळांमध्ये प्रवेश करील व झडती घेईल.

(ख) अशी कोणतीही जाहिरात किंवा कोणतेही पुस्तक, पत्रक, पत्रिका, सरकचित्र, चित्रफीत, लेख, चित्र, रंगचित्र, छायाचित्र, प्रतिरुपण किंवा आकृती ही, या अधिनियमातील कोणत्याही उपबंधांचे उल्लंघन करीत आहे, असे त्यास सकारण वाटत असेल तर तो ती जप्त करील.

(ग) खंड (क) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही जागेत सापडलेल्या कोणत्याही अभिलेखाची, नोंदवहीची, दस्तऐवजाची किंवा इतर कोणत्याही महत्त्वाच्या वस्तूची तपासणी करील व ती या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध केल्याचा पुरावा ठरू शकेल असे जर त्यास सकारण वाटत असेल तर तो ती वस्तू जप्त करील :

परंतु, या पोटकलमान्वये खाजगी राहत्या घरात वॉरंटाशिवाय प्रवेश करता येणार नाही :

आणखी असे की, या कलमाखालील जप्तीच्या शक्तींचा वापर, कोणत्याही दस्तऐवजाची, लेखाची किंवा वस्तूची एकरुपता, उपयुक्तता किंवा विक्री योग्य मूल्य यावर परिणाम न होता, अशा दस्तऐवजावरील, लेखावरील किंवा वस्तूवरील जाहिरात, ती उमटरेखित केल्याच्या किंवा अन्य कारणांमुळे, वेगळी करणे शक्य नसेल तर, अशी कोणतीही जाहिरात अंतर्भूत असलेल्या त्या दस्तऐवजाच्या, लेखाच्या, वस्तूच्या संबंधात तसेच त्यात कोणताही मजकूर असल्यास, त्याच्याही संबंधात करता येईल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यांचे उपबंध हे, उक्त संहितेच्या कलम ९४ खाली काढण्यात आलेल्या वॉरंटाच्या प्राधिकाराअन्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीस व जप्तीस जसे लागू होतात तसेच ते, शक्य होईल तेथवर, या अधिनियमाखाली करण्यात येणाऱ्या झडतीस व जप्तीस लागू करण्यात येतील.

(३) कोणतीही व्यक्ती, तिने पोटकलम (१) चे खंड (ख) व (ग) खाली कोणतीही वस्तू जप्त केली असेल त्याबाबतीत, शक्य तितक्या लवकर, जवळच्या दंडाधिकाऱ्यास कळवील आणि त्या वस्तूच्या अभिरक्षेबाबत त्याचे आदेश घेईल.

शास्ती.

६. जी कोणतीही व्यक्ती, कलम ३ किंवा कलम ४ च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती, पहिल्या दोषसिद्धीनंतर दोन वर्षापर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या व रुपये दोन हजार पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या व दुसऱ्या किंवा नंतरच्या दोषसिद्धीबद्दल किमान सहा महिन्यांच्या, परंतु पाच वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या व किमान दहा हजार रुपये, परंतु एक लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शास्तीस पात्र ठरेल.

कंपनीकडून घडणारे अपराध.

७. (१) एखाद्या कंपनीकडून या अधिनियमाखालील अपराध घडला असेल त्याबाबतीत, तो अपराध घडला त्यावेळेस कंपनीची प्रभारी असलेली व कंपनीच्या कामकाजाच्या चालनास जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, त्याचबरोबर कंपनीही, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्यावर कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा ठोठावण्यास ती पात्र असेल :

परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशा कोणत्याही व्यक्तीने, हा अपराध आपणास काहीही माहीत नसताना घडला आहे व तो अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती खबरदारी घेतली होती, असे सिद्ध केल्यास, ती व्यक्ती कोणत्याही शास्तीस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम १ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये कंपनीने कोणताही अपराध केला असेल आणि हे सिद्ध झाले की, तो अपराध कंपनीच्या संचालकांच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या सहमतीने किंवा मुकानुमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे तर कंपनीचा असा संचालक, व्यवस्थापक, सचिव, किंवा अन्य अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई केली जाईल व त्यानुसार त्याला शिक्षा दिली जाईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता :—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय आणि यात भागीदारी पेढी किंवा व्यक्तींचा अधिसंघ यांचा समावेश होतो, आणि

(ख्) भागीदारी पेढीच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ भागीदारी पेढीचा भागीदार.

जामीनयोग्य व दखली अपराध.

८. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध जामीनयोग्य असेल.

(२).या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध हा दखलपात्र असेल.

सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

९. या अधिनियमाखाली, केंद्र शासनाने किंवा कोणत्याही राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्दिष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही करता येणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

१०. (१) केंद्र शासनाला या अधिनियमाचे उपबंध राबविण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः व पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला बाध न येता अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा—

(क्) ज्या रीतीने जाहिरात किंवा इतर लेख जप्त करण्यात येतील ती रीत व ज्या रीतीने जप्तीची सूची तयार करण्यात येईल व ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेतून जाहिरात किंवा लेख जप्त करण्यात आला असेल त्या व्यक्तीकडे ती सूची ज्या रीतीने सुपूर्द करण्यात येईल, ती रीत.

(ख्) विहित करणे आवश्यक असेल किंवा करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तीत रूपातच परिणामक होईल, किंवा प्रकरण-परत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई